# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### ट्रॅडिशनल डे

लोकमत

# राजगुरु महाविद्यालयात ट्रॅडिशनल डे उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा केला. या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती.

तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली. या वेळी मर्दानी पथकाने विविध कसरती सादर केल्या.

प्राजक्ता गदादे, काजल रामाने या विद्यार्थिनींनी तिरंग्याची वेषभूषा परिधान करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. संदेश भोसले याने मंगल पांडे यांची तर शिवम कदम याने हुतात्मा राजगुरूंची लक्षवेधी वेशभूषा केली.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात आयोजित ट्रॅडिशनल डेमध्ये सहभागी विद्यार्थी.

अनेक विद्यार्थी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोषाखात आले होते. तर अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, बाजीराव-मस्तानी, खंडोबा-म्हाळसा-बानू यांच्या वेशभूषेत आले होते. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात सर्वांचे स्वागत करण्यात आले.

Hello Pune Gramin
Page No. 7 Feb 18, 2020
Powered by: erelego.com

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे' जल्लोषात साजरा



**पाईट : प्रतिनिधी**

राजगुरूनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात दि. १४ ते १७ दरम्यान तरुणाईच्या जल्लोषात ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला.

या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगाच्या वेशभूषा, रंगभूषेने सजली होती. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात 'व्हॅलेंटाइन डे'चे औचित्य साधून शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली. या वेळी मर्दानी पथकाने विविध कसरती सादर केल्या. सोलापूर येथील शिवव्याख्याते खंडोजी डोईफोडे यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र सांगितले.

'ट्रॅडिशनल डे'च्या निमित्ताने हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, बलून डे, रोझ डे, मिसमॅच डे, साडी डे, कोट डे आदी डेज उत्साहात साजरे केले. या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले.विद्यार्थ्यांनी आपले वेगळेपण सादर करताना ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक देखावे सादर केले. प्राजक्ता गदादे, काजल रामाने या विद्यार्थिनींनी तिरंग्याची वेशभूषा करून सामाजिक समता व देशभक्तीचा संदेश दिला. संदेश भोसले याने मंगल पांडे यांची तर शिवम कदम याने हुतात्मा राजगुरूंची लक्षवेधी वेशभूषा केली. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी मराठी, गुजराती, बंगाली, दाक्षिणात्य व राजस्थानी अशा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक पोषाखात आले होते. तर, अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, बाजीराव-मस्तानी, खंडोबा-म्हाळसा-बानू यांच्या वेशात येऊन सहभाग घेतला. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात सर्वांचे स्वागत करण्यात आले. मयूरी कोहिनकर, सुमित रत्नपारखी, पूनम भेंडले, प्राजक्ता गदादे, नेहा गाढवे, अक्षदा गुरव, मयूरी दौंडकर, प्रज्ञा थिटे या विद्यार्थ्यांचा आकर्षक वेशभूषा केल्याबद्दल स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तर, शिवम कदम, काजल साकोरे, वेदांत पिंगळे व स्नेहल नाणेकर यांना सर्वोत्कृष्ट वेशभूषेबद्दल गौरविण्यात आले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख